
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शुक्रवार | 16 जानेवारी 2026 | अंक क्र. 240 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# परळी नगर परिषदेत राष्ट्रवादीचे वर्चस्व

## उपनगराध्यक्षपदी खैसर पठाणांची निवड

## स्वीकृत नगरसेवकांमध्येही राष्ट्रवादीचे तीन

## उपनगराध्यक्ष पदावरून भाजपमध्ये नाराजीची दबक्या आवाजात चर्चा ?

### पिठासीन अधिकाऱ्यांनी मिडियास परवानगी नसल्याचे उपमुख्य अधिकारी यांनी मिडियाशी बोलताना सांगितले



**परळी | प्रतिनिधी**

परळी नगर परिषद निवडणूक २०२५ नंतर आज नगर परिषदेच्या सभागृहात पहिली विशेष सभा पार पडली. या सभेत उपनगराध्यक्ष पदाची निवड तसेच चार स्वीकृत (नामनिर्देशित) नगरसेवकांची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ने आपले वर्चस्व कायम ठेवत उपनगराध्यक्ष पदासह चारपैकी तीन स्वीकृत नगरसेवकांची संधी मिळवली.

**उपनगराध्यक्षपदी खैसर राजाखान पठाण**

नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नगरसेवक खैसर राजाखान पठाण यांची निवड करण्यात आली. नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही पहिली विशेष सभा पार पडली. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण निवड प्रक्रिया पार पडल्याची माहिती देण्यात आली.

**स्वीकृत नगरसेवकांत राष्ट्रवादीचे तीन,**



**भाजपला एक**

चार स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन उमेदवारांना संधी देण्यात आली असून केवळ एक जागा भाजपच्या वाट्याला आली आहे. नगर परिषदेत महायुतीचे संख्याबळ असले तरी महत्त्वाची पदे राष्ट्रवादीकडेच गेल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

**अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही आता आत्मपरीक्षणाची गरज !**

नगरसेवकांप्रमाणेच नगर परिषदेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही आता आत्मपरीक्षणाची गरज आहे. अनेक वर्षे प्रशासकीय राजवटीत राहिलेल्या नगर परिषदेत काही अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेली मस्ती, हलगर्जीपणा आणि मनमानी कारभार यामुळेच अनेक मूलभूत कामे प्रलंबित राहिल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

**नगरसेवक आणि अधिकारी दोघांनाही आता एकच गोष्ट लक्षात ठेवावी आपण सत्ताधारी नाही, तर जनतेचे सेवक आहोत**

आता लोकनियुक्त नगरसेवक सत्तेत आले असताना, अधिकारी आणि कर्मचारी यांनीही आपला मनमानीपणा सोडून कामाच्या गतीला प्राधान्य देणे गरजेचे आहे. नाल्यांची स्वच्छता, पाणी साचण्याचे प्रश्न, दुर्गंधी, रस्त्यांची अवस्था, सार्वजनिक आरोग्य—या सगळ्या बाबी केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून सोडवाव्या लागतील.

नगरसेवक आणि अधिकारी दोघांनाही आता एकच गोष्ट लक्षात ठेवावी लागेल.

**आपण सत्ताधारी नाही, तर जनतेचे सेवक आहोत.**

सेवा दिसली तरच विश्वास टिकेल; अन्यथा जनतेचा संताप व्यक्त व्हायला वेळ लागणार नाही.

उपनगराध्यक्ष पदावरून भाजपमध्ये नाराजी?

उपनगराध्यक्ष पद भाजपकडे येईल, अशी अपेक्षा असताना हे पद राष्ट्रवादीकडे गेल्याने भाजपच्या काही नगरसेवकांमध्ये तीव्र नाराजी पसरल्याची चर्चा आहे. याच नाराजीमुळे भाजपचे काही नगरसेवक निवड प्रक्रियेदरम्यान अनुपस्थित राहिल्याचे बोलले जात आहे. मात्र याबाबत अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

लोकप्रतिनिधींच्या हाती नगर परिषदेची सूत्रे

परळी नगर परिषदेचा कारभार मागील तब्बल चार वर्षे प्रशासकांच्या ताब्यात होता. दीर्घ कालावधीनंतर पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींच्या हाती नगर परिषदेची सूत्रे आली असून पहिल्याच सभेत राजकीय हालचालींना वेग आला आहे.

**पहिल्याच सभेत 'ड्रायफ्रूट नाष्टा' चर्चेत**

आज झालेल्या पहिल्या विशेष सभेत नगरसेवकांना नाष्टा म्हणून काजू, बदाम, किसमिस देण्यात आल्याने नागरिकांमध्येही चर्चांना उधाण आले. रखडलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी नगरसेवकांना 'ऊर्जा देणारा नाष्टा' देण्यात आला असावा, अशा मिश्कील प्रतिक्रिया शहरात उमटत आहेत.

## पहिल्याच सभेत 'ड्रायफ्रूट नाष्टा' चर्चेत



**आज झालेल्या पहिल्या विशेष सभेत नगरसेवकांना नाष्टा म्हणून काजू, बदाम, किसमिस देण्यात आल्याने नागरिकांमध्येही चर्चांना उधाण आले. रखडलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी नगरसेवकांना 'ऊर्जा देणारा नाष्टा' देण्यात आला असावा, अशा मिश्कील प्रतिक्रिया शहरात उमटत आहेत. राज्यसह जिल्हाभरामध्ये अनेक ठिकाणी मीडियाला स्वतंत्रपणे बातम्यांसाठी परवानगी असते परंतु परळी नगर परिषदेमध्ये यापूर्वी आणि आत्ताही कमालीची गुप्तता पाळण्यात येत असल्याची चर्चा मतदान मोजणीच्या दिवशीही आणि कालही ही गुप्तता नेमकी कशासाठी? असा प्रश्न या निमित्ताने निर्माण होत आहे.**

# अंबाजोगाई नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी लोकविकास महाआघाडीचे दिनेश भराडीया यांची बिनविरोध निवड

### स्विकृत नगरसेवकपदी लोकविकास महाआघाडीचे राजकिशोर मोदी व बबनराव लोमटे


**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

अंबाजोगाई नगरपरिषदेमध्ये लोकविकास महाआघाडीच्या तिकिटावर व राजकिशोर मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्वाधिक २० नगरसेवक निवडून आले. या निवडून आलेल्या नगरसेवकांमधून अंबाजोगाई नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी दिनेश मोतीलाल भराडीया यांची तर स्विकृत नगरसेवक म्हणून राजकिशोर मोदी व बबनराव लोमटे बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडींमुळे लोकविकास महाआघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला असून नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष व स्विकृत नगरसेवक यांच्यावर सर्वस्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लोकविकास महाआघाडीचे गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक महेश बालासाहेब लोमटे, नगरसेवक मालू भगवान जोगदंड आणि नगरसेवक आकाश जिवनराव कराड यांच्यासह जाऊन गुरूवार, दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी नगरसेवक दिनेश भराडीया यांनी लोकविकास महाआघाडीच्या वतीने उपनगराध्यक्षपदासाठी आपला उमेदवारी अर्ज मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्याकडे दाखल केला होता. त्यानंतर नगरपरिषदेच्या पहिल्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत उपनगराध्यक्ष व स्विकृत सदस्य निवड करण्यासंदर्भात ठराव घेऊन ते मंजूर करण्यात आले. यावेळी लोकविकास महाआघाडीचे संख्याबळ पहाता उपनगराध्यक्षपदासाठी अन्य कोणाचाही उमेदवारी अर्ज न आल्याने दिनेश मोतीलाल भराडीया यांची अंबाजोगाई नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली असल्याचे यावेळी मुख्याधिकारी प्रियंका टोंगे यांच्याकडून जाहीर करण्यात आले. यावेळी लोकविकास महाआघाडीचे प्रमुख नगरसेवक राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, ज्येष्ठ विधीज्ञ ऍड.विष्णुपंत सोळंके, डॉ.नरेंद्र काळे, विशाल जाजू, गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक बबनराव लोमटे, ज्येष्ठ नगरसेवक हाजी इस्माईल हिरू गवळी, महेश बाळासाहेब कदम, महेश बालासाहेब लोमटे, ऍड.विकास रामकृष्ण काकडे, मालू भगवान जोगदंड, आकाश जिवनराव कराड, राजपाल संभाजी जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, सौ.जयश्रीताई पृथ्वीराज साठे, सौ.दिपाताई बबन ऊर्फ दाजीसाहेब लोमटे, शेख शमीम शेख रहीम, बशीरा शफीक सय्यद, नाजनीन बेगम अकबरखाँ पठाण, शेख शिरीन अशफाक, सौ.श्रुतीताई अमोलराव लोमटे, सौ.संगिताताई दाजीसाहेब लोमटे, सौ.रेखाताई विलास जाधव, सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे हे लोकविकास महाआघाडीचे सर्व २० नगरसेवक आणि संकेत भैय्या मोदी, खालेदभाई चाऊस, रिपाइं नेते महेंद्र निकाळजे, भिमशक्तीचे भिमराव सरवदे, मनसे नेते सुनील जगताप, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाहुळे, युवा आंदोलनचे अशोक पालके, बेटी बचावचे धीमंत राष्ट्रपाल, राष्ट्रवादीचे कल्याण भिसे, अमित जाजू, शेख मुख्तार, सय्यद रशीदभाई, अमोल लोमटे, भिमसेन लोमटे, अकबरभाई पठाण, सचिन जाधव, ऍड.अनिल लोमटे, जफरभाई शेख, रौफभाई बिल्डर, जावेद गवळी, विशाल पोटभरे हे उपस्थित होते. यावेळी नगरसेवक राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, डॉ.नरेंद्र काळे, ऍड.विष्णुपंत सोळंके, विशाल जाजू, गटनेते सय्यद ताहेरभाई, नगरसेवक बबनराव लोमटे, दिलीपराव काळे व सर्व नगरसेवकांनी नुतन उपनगराध्यक्ष दिनेश भराडीया यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या, व आगामी काळात अंबाजोगाई शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी लोकविकास महाआघाडीच्या कार्यकर्त्यांकडून निवडीचे स्वागत करून फटाके फोडून, पेढे वाटून, गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा केला.

**सर्वांना सोबत घेऊन अंबाजोगाईचा विकास :**

लोक विकास महाआघाडीच्या नवनिर्वाचित सर्व २० नगरसेवकांनी एकत्रित येत सर्वानुमते नगरपरिषदेत महाआघाडीचा अधिकृत गट स्थापन केला आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना लेखी पत्र देण्यात आले असून गट स्थापन करण्याबाबत व गटनेता निवडीचा ठराव व त्याबद्दलचे इतिवृत्त यापूर्वीच सादर करण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वीच लोक विकास महाआघाडीच्या गटनेतेपदी सय्यद ताहेरभाई यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडपत्राच्या अनुषंगाने गट स्थापन करून गटनेता निवड केल्याचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम व संबंधित नियमानुसार या गटाची अधिकृत नोंद घेण्यात यावी, अशी विनंती पत्राद्वारे करण्यात आलेली आहे. त्यानंतर उपनगराध्यक्षपदासाठी दिनेश मोतीलाल भराडीया, स्विकृत नगरसेवकपदी माझी व आमचे सहकारी बबनराव लोमटे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अंबाजोगाई शहरातील नागरिकांच्या सेवेसाठी आम्ही सदैव कटिबद्ध आहोत. सर्वांना सोबत घेऊन सर्वांचा विकास हा आपला नेहमीचा मानक असून यासाठी पुढील जबाबदाऱ्या देताना सामाजिक अभिसरण व ज्येष्ठ व नव्या प्रतिनिधींची सांगड घालण्याचा आमचा विधायक प्रयत्न राहणार आहे. याच अभिसरण व समीकरणात माझे सहकारी दिनेश भराडीया यांची नगरपरिषद उपनगराध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.





# मुलांसोबत करा घट्ट नातं

सध्याच्या धावपळीच्या स्पर्धात्मक युगात आधुनिक पालकांचे आपल्या मुलांकडे होणारे दुर्लक्ष एक मोठी समस्या आहे. कारण मुलाला गरज असतानाच जर पालक जवळ नसतील तर अशाने पालक आणि मुलातला दुरावा वाढत जाऊन खूप मोठे रूप घेऊ शकतो. मुलगा आपल्या पालकांचा राग करू शकतो. त्यांच्या मनात आपल्या आई वडिलांविषयी काहीच प्रेम राहणार नाही. शेवटी मुल मोठं झालं की मग मात्र नातं पूर्ववत करणे कठीण होऊन बसते. म्हणून वेळ असतानाच वेळात वेळ काढून आई वडिलांनी मुलांना शक्य तितका वेळ द्यावा. पण कामातच सगळा वेळ जातो मग कसा वेळ देणार? हा प्रश्न तुमच्या मनात आला असेल, तर आज आम्ही तुम्हाला सांगणार होत काही खास सवयी, ज्या पालकांनी स्वत:ला लावून घ्याव्यात. या सवयी तुम्ही स्वत:ला लावल्यात तर तुमचे आणि तुमच्या मुलामधील नाते नक्कीच अधिक घट्ट होईल. एका संशोधनानुसार हे दिसून आले आहे की मुलांसोबात जेवायला बसल्याने ते आपल्या आईवडिलांच्या आहारा सबंधितच्या सवयी आत्मसात करतात. जेवताना तुम्ही ज्या गोष्टी कराल, जे संवाध साधाल तो ते मन लावून ऐकतात आणि त्यांची मानसिक जडणघडण उत्तम होते. या शिवाय योग्य आहार घेतल्याने शारीरिक स्थिती सुद्धा तंदुरुस्त राहते. त्यामुळे वेळात वेळ काढून तुम्ही किमान रात्रीच्या वेळेस आपल्या मुलांसोबत जेवायला बसायला हवे. जर हे सुद्धा शक्य नसेल तर सकाळचा नाश्ता सर्व कुटुंबांनी एकत्र करा.

# गोडी अभ्यासाची

कोणत्याही आईवडिलांना विचारा की त्यांची त्यांच्या मुलाबाबत काय तक्रार आहे? तर सगळ्या आईवडीलांचे एकच म्हणणं असेल की आमचा मुलगा आहे तसा चांगला पण अभ्यास अजिबात करत नाही. अभ्यास करायला म्हटलं की तोंड वाकडं करतो. ही आता एक प्रकारे अख्ख्या जगातील पालकांची समस्या झाली आहे. आताचे पालक काहीसे मुलांच्या बाबतीत सौम्य असतात, पूर्वीच्या पालकांइतके कडक नसतात. पूर्वी पालकांना घाबरून मुलं गप्प आपला अभ्यास करायची. पण आता परिस्थिती अगदी उलट आहे. त्यात मुलांचं अभ्यासापासून लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टी जसे की मोबाईल, गेम्स, इंटरनेट यांची व्याप्ती सुद्धा वाढली आहे. त्यामुळे फार कमी मुलं असतात ज्यांना अभ्यासाची गोडी लागते. अशावेळी प्रत्येक आईवडिलांना हाच प्रश्न सतावत असतो की आपल्या मुलाला अभ्यासाची गोडी कशी लावायची? चला आज आम्ही याच प्रश्नाचं उत्तर तुम्हाला या विशेष लेखातून देणार आहोत. जाणून घ्या या टिप्स आणि लावा तुमच्या मुलाला अभ्यासाची गोडी..! मुल अभ्यास करत असताना त्याला प्रोत्साहित करण्याचा सगळ्यात सोप्पा मार्ग म्हणजे त्याच्या बाजूला बसणे आणि त्याची स्तुती करणे. आपण जे काही करतो आहे त्यामुळे आपली वाहवा होत आहे हे कोणत्याही मुलासाठी प्रेरणा असते. त्यामुळे जेव्हा कधी मुल अभ्यासाला बसलेलं दिसेल तेव्हा तुमची काम काही वेळ बाजूला ठेवून त्याच्या सोबत बसा. यामुळे मुल देखील अभ्यास मन लावून करू लागेल आणि मुल कसं अभ्यास करतं हे तुम्हाला सुद्धा कळतं. मुलाचा अभ्यासातला रस निघून जाण्यामागे सगळ्यात मोठे कारण असते पालकांचा प्रेशर. सतत मुलाला अभ्यास करायला सांगणे किंवा अभ्यास करून चांगले मार्क्स मिळवलेच पाहिजेत असं दटावणे हे चुकीचे आहे. अश्याने मुलाच्या मनावर अपेक्षांचं ओझं तयार होतं. आपण चांगले मार्क्स मिळवले नाहीत तर आई वडील आपल्याला मारतील ही भीती त्याच्या मनात निर्माण होते आणि त्या भीतीमुळे त्याचा जो काही अभ्यासातील रस असतो तो हळूहळू निघून जातो आणि अभ्यासातील त्याचे लक्ष उडते. त्यामुळे शक्य तितका कमी दबाव त्याच्यावर टाका आणि त्याला त्याच्या पद्धतीने अभ्यास करू द्या.





# रहस्यमय अमेझॉन जंगल

आज पर्यंत आपन अनेक जंगले बघीतली असतील. जंगलांमध्ये फिरण्याचा आंनद घेतला असेल. पण जगात एक असे जंगल आहे की जे सर्वात खतरनाक आणि रहस्यमय जंगल म्हणून ओळखल्या जाते. ते म्हणजे अमेझॉननचे जंगल. हे जंगल जगातील सर्वात खतरनाक आणि रहस्यमयी आहे. या रहस्यमयी जंगलात अनेक विषारी किडे, जीवजंतू आणि खतरनाक प्राणी आहेत. येथील छोटे-छोटे किडे आणि प्राणी माणसाचा जीव घेऊ शकतात. या जंगलात फिरायला जाणे म्हणजे मृत्युला आमंत्रण देण्यासारखे आहे. जर कोणी या जंगलात चुकून गेला तर त्याचे बाहेर येणे अशक्य असते. कारण हे जंगल खुप घनदाट आहे. येथे असलेल्या घनदाट वृक्षांमूळे सुर्याचे किरण देखील जमीनीपर्यंत पोहोचत नाही. अमेझॉनचे जंगल बाहेरून जेवढे आकर्षक दिसते तेव्हढेच ते आतून भयंकर आणि रहस्यमय आहेत. तुम्ही या भयंकर जंगलात फोन सुद्धा लावू शकत नाही. कारण इथे मोबाइल नेटवर्क उपलब्ध नाही जगातील सर्वात मोठे जंगल. अमेझॉन जंगल जागातील सर्वात मोठे जंगल आहे. या जंगलाचा विस्तार ९ देशांमध्ये आहे. जंगलाचा सर्वात मोठा भाग (६० टक्के) ब्राझील देशात आहे. त्यानंतर या जंगलाचा १३ टक्के भाग (दुसरा मोठा भाग) पेरू देशात आहेत. कोलंबिया, फ्रान्स, इक्वेडोर, गयाना, बोलिव्हिया, सुरीनाम आणि व्हेनेझुएला या देशात अमेझॉनचे जंगल पसरलेले आहेत. पृथ्वीच्या एकून ४ टक्के भागात हे जंगल पसरलेले आहे. अमेझॉन जंगलाचे क्षेत्रफळ ५५ लाख चौरस किलोमीटर इतके आहे. अमेझॉन जंगलाबद्दल मानवाला पुर्णपणे माहिती नाही. या जंगलामध्ये असे अनेक रहस्यमय ठिकाणे आणि प्राणी आहेत. ज्यांचा शोध अजून पर्यंत शास्त्रज्ञ लावू शकले नाहीत. मानवाला विचार करायला भाग पाडणारे वृक्ष, प्राणी आणि ठिकाणे अमेझॉनच्या जंगलामध्ये आहेत. अमेझॉनच्या जंगलामध्ये आढळणारे चालणारे झाड, रहस्यमय नदी, खतरनाक पोटू पक्षी, विषारी बेंडूक आणि मुंगी (ईंश्रश्रशीं अपीं) यांच्या बद्दल माहिती वाचल्यानंतर निसर्ग किती रहस्यमय आहे हे तुम्हाला समजेल. पृथ्वीला २०% ऑक्सिजन एकटं अमेझॉन जंगल पुरवते. म्हणून अमेझॉनच्या जंगलाला पृथ्वीचे फुफ्फुस म्हटले जाते. या जंगलात ५०० पेक्षा जास्त आदिवासी प्रजाती आहेत. पण यामध्ये ४० ते ५० टक्के प्रजातींचा बाहेरच्या जगाशी संपर्क नाही. जे लोक या प्रजातींचा शोध घेण्यासाठी गेले ते परत जिवंत परतले नाही. यावरून आपन या प्रजाती किती खतरनाक असतील याचा अंदाज लावू शकतो.

## सामान्य ज्ञान

असा कोणता प्राणी आहे जो एकाच वेळेला दोन वेगवेगळ्या दिशेला बघू शकतो?
**उत्तर :- सरडा**

कोणत्या धातूचा उपयोग टिकाऊ चुंबक तयार करण्यासाठी करण्यात येतो?
**उत्तर :- पोलाद**

भारतातील कोणत्या राज्यात सर्वात जास्त हत्ती बघायला भेटतात?
**उत्तर :- कर्नाटक**

कोणते तेल हदयविकार असणाऱ्या व्यक्तीस उपयुक्त आहे?
**उत्तर :- करडई**

हाडांच्या वाढीसाठी कोणते जीवनसत्व आवश्यक असते ?
**उत्तर :- 'ड' जीवनसत्व**


खाद्यपदार्थात खाण्याच्या सोड्याचा सर्वाधिक वापर केल्यास कोणत्या जीवनसत्वाचा नाश होतो?
**उत्तर :- 'क' जीवनसत्व**

काकडी किव्हा टरबूज यांसारख्या फळभाज्यांमध्ये पाण्याचे प्रमाण किती असते?
**उत्तर :- ९२ टक्के**

## सामान्य ज्ञान

दुधात मिसळलेले पाणी देखील दूध बनते. त्याचप्रकारे आपण चांगल्या लोकांबरोबरही मैत्री करुण चांगले होऊ शकतो. म्हणूनच आपण चांगल्या लोकांसंगे मैत्री केली पाहिजे.

# ...मुले सुद्धा पडू शकतात डिप्रेशनला बळी!



डिप्रेशन हे फक्त वयस्कर व्यक्तींमध्येच आढळून येते ही अफवा आहे. कारण लहान लहान मुलंही या डिप्रेशनची शिकार होऊ शकतात. पण तुमचं मुल उदास आहे म्हणजे ते डिप्रेशन मध्ये गेलंय असं मुळीच नाही. पण मुल सतत उदास किंवा नाराज असेल, घरातील किंवा शाळेतील लोकांशी बोलण्यात त्याला अडथळा येत असेल तर हे नक्कीच डिप्रेशन असू शकतं. डिप्रेशन हा एक गंभीर आजार आहे. पण घाबरु नका मंडळी कारण या आजारावर औषधे आणि उपचार देखील उपलब्ध आहेत. त्यामुळे जर आजवर तुम्हाला वाटत असेल की आपल्या मुलाला कोणतेही डिप्रेशन नाहीये किंवा येऊच शकत नाही तर थांबा आणि खाली दिलेली लक्षणे आणि संकेत जाणून घ्या. या संकेतांवरुनच तुम्हाला समजू शकेल की तुमचं मुल डिप्रेशनला बळी गेलं आहे का?
ब-याच मुलांना शाळेमधील मोठ्या वयाच्या किंवा काही मस्तीखोर मुलांनी छेडल्यामुळे डिप्रेशन येतं. तसेच घरातील आवारात किंवा शाळेत कोणाकडूनही दमदाटी केली गेल्याने मुलं सतत ताणतणावात राहू लागतं आणि काही कालावधीने त्याचं रुपांतर डिप्रेशनमध्ये होते. सतत मानसिक दबाव असल्यानेही मुलं डिप्रेशनची बळी पडतात.आता हा ताण अभ्यासाचा किंवा आई-वडिलांच्या इच्छा-अपेक्षांचा किंवा इतर कोणत्या गोष्टीचाही असू शकतो. ज्या मुलांच्या कुटुंबीयांना डिप्रेशनचा आजार असतो त्या मुलांनाही या आजाराचा सामना करावा लागतो. अशा मुलांमध्ये इतर साध्या मुलांपेक्षा डिप्रेशनमध्ये जाण्याचे प्रमाण जास्त असते. पण हे देखील तितकंच खरं आहे की ज्या मुलांच्या कुटुंबातील कोणाला हा त्रास नाही त्यांना याचा धोका असूच शकत नाही. जर तुम्हाला तुमच्या मुलाला डिप्रेशनचा धोका असल्याचा संशय येत असेल तर तुम्ही त्याच्या भावनांकडे, वागणूकीकडे लक्ष ठेवा. वयस्कर लोकांसारखं लहान मुलं सतत होणा-या बदलांना स्विकारु शकत नाही. नवीन घरात किंवा शाळेत जाणं, पालकांची भांडण-तंटे समोरुन पाहणं, भाऊ-बहिण किंवा आजी-आजोबांपासून दूर होणं या सर्व गोष्टी मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम करतात. जर तुम्हाला वरील पैकी कोणत्याही कारणाने तुमचं मुल डिप्रेशनमध्ये जाताना आढळत असेल तर ताबडतोब त्याच्याशी संवाद साधा. तसेच कुटुंबातील कोणत्या मोठ्या घटनेमुळे आपल्या मुलाच्या बालमनावर परिणाम होत असेल तर लगेचच त्याचे उपचार करणं सुरु करा.
कधी कधी शरीरातील हार्मोन्सच्या असंतुलनामुळेही लहान मुलांना डिप्रेशन येऊ शकते. हार्मोन्स बदल आणि विकास होण्यामुळे असं होऊ शकतं. पण असं पोषक तत्वांची शरीरातील कमी आणि शारीरिक हालचाल कमी करण्यामुळे देखील होऊ शकते. त्यामुळे लहान मुलांचा विकास योग्यरितीने होतो आहे की नाही याची खात्री करण्यासाठी मुलाची सतत तपासणी करत राहा. तर आपल्या मुलाच्या या गोष्टींवर अगदी बारकाईने नजर ठेवा आणि डिप्रेशनचा आजार त्याला जडल्यास घाबरुन न जाता वेळीच त्यावर उपाययोजना करा.

# रोबोट म्हणजे काय?

मित्रांनो रोबोट हा शब्द आपण कधीतरी ऐकला असेल. अनेक चित्रपटामध्ये पाहिला सुद्धा असेल, पण तुम्हाला रोबोट बद्दल संपूर्ण माहिती नसेल. म्हणून मित्रानो आजच्या या पोस्टमध्ये आपण रोबोट म्हणजे काय, रोबोट काम कसं करतो, रोबोट चे प्रकार याची माहिती जाणून घेणार आहोत. रोबोट एक प्रकारची मशीन आहे, जी खासकरून कॉम्प्युटर द्वारा दिलेल्या प्रोग्राम च्या नियमानुसार काम करते. रोबोट अनेक अवघड कामे सोपे करण्यास सक्षम असतो. रोबोट हा मॅकेनिकल, सॉफ्टवेअर आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग च्या मिश्रणाने मिळून बनलेला असतो. यामध्ये सर्वांचं योगदान सारखच असतं. रोबोट एक प्रकारची मशीन आहे, जी अशा प्रकारे तयार केली जाते की एकापेक्षा जास्त कामे समान गतीने आणि एकदम बरोबर करेल. काही रोबोटला नियंत्रित करण्यासाठी डिवाइसचा वापर केला जातो, परंतु जास्त प्रमाणात रोबोट ला नियंत्रित करण्यासाठी रोबोट मध्येच डिवाइस वापरले जातात. रोबोटचा आकार यांचं काही देणं घेणं नसतं. जो हुबेहूब माणसाप्रमाणे दिसतो त्यालाच रोबोट म्हंटले जाते ही गोष्ट पूर्णपणे चुकीची आहे. रोबोट हा कोणत्याही रुपात असू शकतो. जास्त करून ते त्या कामावरून ठरवले जाते. समजा एखादी ऑटोमोबाईल कंपनी आहे जेथे दोन चाकी आणि चार चाकी वाहनांचे बनवले जातात. यामध्ये छोट्या आणि मोठ्या पार्टस ला वेल्डिंग करून जी वस्तू समोर येते त्याला कार म्हणतात. ती काही छोट्या आणि मोठ्या पार्टसनी बनलेली असते. या छोट्या आणि मोठ्या पार्टस ला जोडायच काम कोण करतं? होय तुम्ही बरोबर ओळखलत! रोबोट करतो वास्तविक रुपात सर्वात पहिला रोबोट बनवण्याच श्रेय स्पेरी जायरोस्कोप यांना दिलं जातं. त्यांनी सन १९१३ मध्ये हा रोबोट बनवला होता. परंतु १९३२ मध्ये त्यांनी तो लंडनमधील रेडिओ वरून लोकांसमोर आणला. सर्वात पहिल्यांदा १९८० मध्ये एका मोटर कार कंपनी ने २०० मजुरांना कामावरून काढून ५० रोबोट ला कामावर ठेवले होते. आणि हा रोबोट लोकांना खूपच आवडला. पूमा नावाचा हा रोबोट कारखान्यातील मशीन चे स्क्रू काढण्यासाठी वापरला जात होता.



# गरुड आणि घुबड

एक गरुड आणि एक घुबड, फार दिवस एकमेकांशी भांडत असत. शेवटी त्यांनी परस्परांशी मित्रत्वाने वागण्याची शपथ घेतली व एकमेकांच्या पिल्लांस खाऊ नये असे ठरविले. घुबड गरुडास म्हणाले, 'गडया ! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला ठाऊक आहे ना? ठाऊक नसेल, तर ती दुसऱ्या एखादया पक्ष्याची आहेत असे समजून तू त्यांना गट्ट करशील, अशी मला भीति वाटते,' गरुड म्हणाला, 'खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, हे मला मुळीच ठाऊक नाही.' घुबड म्हणाले, 'ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल.' पुढे एके दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. त्यांजकडे पाहून तो म्हणाला, 'किती घाणेरडी, कंडाळवाणी आणि कुरूप पिल्ले ही ! आपली पिल्ले फार सुंदर असतात, म्हणून घुबडाने सांगितले आहे. तेव्हा, ही घुबडाची पिल्ले खास नव्हते. यास मारून खाण्यास काही हरकत नाही.' असे म्हणून त्याने त्या पिलांचा फडशा उडविला ! आपली पिल्ले नाहीशी झालेली पाहून घुबड गरुडाला म्हणाले, 'गडया ! माझी पिल्ले तूच मारून खाल्लीस, असे मला वाटते.' गरुड म्हणाला, 'मी खाल्ली खरी, पण तो माझा दोष नव्हे. तू आपल्या पिल्लाचे जे खोटेचे वर्णन केलेस, त्यामुळे ती मला ओळखिता आली नाहीत. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील, दुसऱ्या एखादया पक्ष्याची असतील, असे समजून मी ती मारून खाल्ली, यात माझा काय अपराध आहे बरे?'

# विज्ञानाचे चमत्कार

विज्ञानाचे चमत्कार किती विलक्षण व अद्भुतरम्य आहेत.आपल्या भोवतालच्या अज्ञानाचा अंधार विज्ञानाच्या प्रकाशाने दूर झाला आहे. विजेच्या सहाय्याने माणसाने आपले मर्यादित मानवी सामर्थ्य अनेक पटीने वाढले आहे. आजच्या गृहिणी जवळ स्वयंपाक घरात विजेवर चालणारी अनेक उपकरणे आहेत. ही उपकरणे गृहिणीचे काम त्वरित आणि तत्परतेने करतात. विजेच्या साहाय्याने चालणारा पंखा आणि कुलर उन्हाळा सुसह्य करतात. तर विजेच्या सहाय्याने चालणारा पंखा आणि कुलर उन्हाळा सुसह्य करतात.तर विजेच्या शेगडी मुळे थंडीचा कडाका ही सुखावलो होतो. माणसाच्या व्यक्तिगत जीवनात प्रमाणेच औद्योगिक क्षेत्रातही विज्ञानाने फार मोठी क्रांती केली आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे अत्याधुनिक छपाई यंत्रावर दैनिक वृत्तपत्राच्या लाखो प्रती काही तासातच छापून वितरणासाठी तयार होतात.असंभाव्य वाटणाऱ्या गोष्टी विज्ञानाने माणसाला सहज साध्य करून दिल्या आहेत. आज माणसाने विज्ञानाच्या साह्याने भूमी प्रमाणेच सागरावर आणि अंतरिक्षा वही स्वामित्व मिळवले आहे. तो आता सागराच्या उदरातही प्रवेश करू शकतो. अंतराळयानाच्या साह्याने माणसाने वसुधेची व सूर्याची परिक्रमा केली आहे. चंद्रावर पाऊल टाकले आहे.आणि आता तो अन्य ग्रहांवरही पाऊल टाकण्याच्या प्रयत्नात आहे. विज्ञानाच्या सहाय्याने वैद्यकीय क्षेत्रातही मानवाने फार मोठी झेप घेतली आहे. मानवाची निरुपयोगी झालेले अवयव शस्त्रक्रिया करून बदलता येतात. व्यक्तीला सुंदर बनवले जाते तर अपंगाचे व्यंगत्व घालून त्याला जीवनात यशस्वी वाटचाल करण्याची प्रेरणा दिली जाते. ही सारी विज्ञानाची किमया आहे. रक्तदानाच्या पुढचे पाऊल अवयवदान दुर्बिणीतून शस्त्रक्रिया होऊ लागेल त्यामुळे शल्यक्रिया चे काम सुलभ झाले. विज्ञानाच्या मदतीने माणसाने भूगोलावर ही मात केली. एकेकाळी वाळवंटी असलेल्या प्रदेशात आता फुलबागा बहरत आहेत.वसुंधरेची उत्पादनक्षमता वाढवून हरितक्रांती साधली जात आहे. माणसाने विज्ञानाच्या मदतीने आपल्या मनोरंजनाच्या साधनांत भर टाकली आहे. संगणकाच्या शोधाने तर माणसाने फार मोठी प्रभावी सामर्थ्य संपादन केले आहे.

## वाघाच्या मावशीची मदत करा




## चित्र रंगवा



## सुडोकू

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | | 3 | |
| 2 | | | |
| | | | 4 |
| | 1 | | |

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# सांगलीच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

## जिल्हा परिषद शाळेतील 2300 विद्यार्थी खेळाडू सहभागी

**भाटवडे/ सांगली**

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने १२ व १३ जानेवारी २०२६ रोजी सांगली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूंना खेळता यावे व त्यांच्या क्रीडा गुणांचा विकास व्हावा म्हणून त्यांना योग्य ती संधी उपलब्ध व्हावी म्हणून सांगली जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वयोगटानुसार वैयक्तिक व सांघिक सामने घेतले गेले. दोन दिवस चाललेले या स्पर्धेत जवळपास २३०० विद्यार्थी आणि ३०० मार्गदर्शक शिक्षक सहभागी झाले.

सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगली जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी अतिशय नेटके नियोजन, संयोजन करून जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा सलग चौथ्या वर्षी यशस्वी केल्या. यातून त्यांच्या परफेक्ट नियोजन कौशल्याची प्रचिती पुन्हा एकदा जिल्ह्याने अनुभवली.

### खेलोगे कुदोगे तो नवाब बनोगे : विशाल नरवाडे



**सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे हे कबड्डीचा अंतिम सामना पाहण्यासाठी उपस्थित राहिले. बक्षीस वितरण प्रसंगी त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. सर्वांचे अभिनंदन केले. खेळात हार जीत ही होतच असते हे सांगताना त्यांनी, खेलोगे कुदोगे तो आप नवाब बनोगे, असे सांगताना त्यांनी चार भिंतीच्या आतील शिक्षणाबरोबरच मुलांनी खेळले पाहिजे ही बाब अधोरेखित केली. शिक्षकांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच खेळण्यासाठीही संधी द्यावी असे आवाहन केले.**

बक्षिस वितरण सोहळा सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद काळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रामपंचायत) शशिकांत शिंदे, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक किरण सायमोते तसेच ग्रामीण पाणी पुरवठाचे संजय येवले, जिल्हा शिक्षक संघटनांचे जिल्हाध्यक्ष, सर्व विद्यार्थी खेळाडू, त्यांचे मार्गदर्शक शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य यांच्या उपस्थितीत पार पडला. स्वागत व प्रास्ताविक शिक्षणाधिकारी मोहनराव गायकवाड यांनी केले. याप्रसंगी ते म्हणाले, खेळातून विद्यार्थ्यांचे करिअर घडू शकते.




शासकीय नोकरीमध्ये खेळाडूंना पाच टक्के जागा राखीव असतात.आपण समर्पित भावनेने खेळल्यास यश आपलेच असते. सर्व पंचांनी चांगली कामगिरी केल्याबद्दल त्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

याप्रसंगी विशाल नरवाडे यांनी फायनलचा कबड्डीचा सामना पाहिला. विजेत्या संघाचे त्याचबरोबर उपविजेत्या संघाचेही त्यांनी अभिनंदन केले. विजेत्या खेळाडूंना मेडल, शील्ड, प्रमाणपत्र व किट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी ते म्हणाले, जिंकण्या- हरण्यापेक्षा खेळ भावनेने खेळले पाहिजे. तालुक्याच्या ठिकाणी एखादी टीम किंवा विद्यार्थी उपविजेता ठरला असेल तर त्यालाही जिल्हास्तरावर संधी द्यायला हवी. जिल्हास्तरानंतर विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित केल्या जाव्यात. आणखी काही वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यासाठी आपण शासन स्तरावर पाठपुरावा करू, असे त्यांनी सांगितले. खेलोगे, कुदोगे तो आप नवाब बन सकते है, असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली . शिक्षण फक्त चार भितीच्या आत घडत नाही. त्यासाठी विद्यार्थी हा खेळला पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी विशाल नरवाडे यांनी क्रिडा सार्धेचे नियोजन आणि व्यवस्थापन करणाऱ्या शिक्षण विस्तार अधिकारी रंगराव आठवले, विजय बंडगर, रामचंद्र टोणे, सुलोचना चव्हाण, प्रशांत शेटे, जयंत सातपुते, नारायण पवार, अमोल माने, तारीश आत्तार, काकासाहेब कदम, सिद्धू कोरे, बंडू गायकवाड, पांडुरंग गायकवाड, वैभव बंडगर, वैभव आंबी, सुजाता हंकारे यांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. सूत्रसंचालन सिकंदर मोमीन आणि श्रीमती विनया कुलकर्णी यांनी केले. आभार प्रभारी उपशिक्षणाधिकारी डॉ. विमल माने यांनी मानले. असोसिएशनचे कबड्डीचे पंच हॅलो मुजावर, खो-खोचे पंच शुभम सकट, सुशांत सूर्यवंशी, अजित पाटील यांनी मैदानावरील नियोजन पार पाडले.

---

# मुंबई मनपासाठी 52.94 टक्के मतदान

**मुंबई वृत्तसंस्था**

देशाची आर्थिक राजधानी अशी ओळख मिरवणाऱ्या मुंबई महापालिकेसाठी गुरुवार १५ जानेवारी रोजी एकूण ५२.९४ टक्के मतदान झाले. संध्याकाळपर्यंत ५४ लाख ७६ हजार ४३ मतदारांनी मतदान केले. मुंबईत २९ लाख २३ हजार ४३३ पुरुष आणि २५ लाख ५२ हजार ३५९ महिला तसेच २५१ इतर मतदारांनी मतदान केले.

मुंबई महानगरपालिका क्षेत्रात एकूण १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार नोंदणीकृत असून, यामध्ये ५५ लाख १६ हजार ७०७ पुरुष, ४८ लाख २६ हजार ५०९ महिला आणि १ हजार ९९ इतर मतदारांचा समावेश आहे. सकाळी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर सुरुवातीच्या टप्प्यात मतदानाची गती मंद होती, मात्र दुपारनंतर मतदानात वाढ झाली.

काही भागांमध्ये मतदान केंद्र बदलण्यात आल्याने मतदारांची धावपळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. मतदार यादीत नावे नसणे, तसेच मतदानानंतर बोटावरील शाई पुसली जात असल्याच्या तक्रारीही समोर आल्या आहेत. या प्रकारांमुळे अनेक मतदारांनी नाराजी व्यक्त केली. मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२७ प्रभागांसाठी सुमारे १,७०० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. आज सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीला सुरुवात होणार असून, दुपारनंतर मुंबई महापालिकेवर कोणाची सत्ता येणार याचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

### वेळेनुसार मतदानाची टक्केवारी :

**सकाळी ९.३० वाजेपर्यंत – ६.९८% सकाळी ११.३० वाजेपर्यंत – १७.७३% दुपारी १.३० वाजेपर्यंत – २९.९६% दुपारी ३.३० वाजेपर्यंत – ४१.०८% सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत – ५२.९४%**



---

# ताज ग्रुपच्या आलिशान प्रकल्पाला 'ग्रीन सिग्नल'

सिंधुदुर्ग : निसर्गरम्य सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या शिरपेचात आता मानाचा तुरा रोवला जाणार आहे. शिरोडा-वेळाघर येथे अनेक वर्षांपासून रखडलेल्या इंडियन हॉटेल कंपनी लिमिटेड (ताज ग्रुप) च्या पहिल्या पंचतारांकित हॉटेल प्रकल्पाला अखेर गती मिळाली आहे. राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत पार पडलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत या प्रकल्पातील अडथळे दूर करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे सिंधुदुर्गात जागतिक दर्जाच्या पर्यटनाची कवाडं खुली होणार आहेत.

**शेतकरी आणि ग्रामस्थांच्या हिताला प्राधान्य**

मुंबईतील 'मेघदूत' निवासस्थानी झालेल्या या बैठकीत ५२.६३ हेक्टर जमिनीच्या भूसंपादनावर सखोल चर्चा करण्यात आली. जमिनीचा मोबदला आणि वाढीव कालावधीमुळे निर्माण झालेले प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने विशेष पॅकेजला तत्त्वतः मान्यता दिली आहे. "प्रकल्पग्रस्तांना दोन टप्प्यात तातडीने मोबदला द्या," असे निर्देश मंत्री शंभूराज देसाई यांनी प्रशासनाला दिले आहेत.

**त्रिपक्षीय करार आणि रोजगाराची हमी**

या प्रकल्पाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये होणारा 'त्रिपक्षीय करार'. स्थानिक ग्रामस्थ, ताज ग्रुप आणि पर्यटन विभाग यांच्यात हा करार होणार असून, याद्वारे स्थानिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासोबतच स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे बंधनकारक करण्यात येणार आहे. यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला मोठी गती मिळणार आहे.

---

## संपादकीय

# महाराष्ट्रातही 'पारो'

महाराष्ट्रातल्याच एका कुटुंबाने महाराष्ट्राच्या आदिवासी जमातीतील एक मुलगी विकत घेण्याचा हा प्रकार गंभीर तर आहेच; पण अन्य भागातला हा गैरप्रकार महाराष्ट्रातही फोफावला असल्याचा पुरावा आहे. महाराष्ट्र हे सामाजिक - सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानलं जात असलं, तरी इथेही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार घडतच नाहीत, असं कोणी म्हणू शकणार नाही.

भारतातली स्त्री मुक्ती चळवळ आपलं सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत असतानाच मुंबईपासून अवघ्या ८० किलोमीटर अंतरावर तीन लाख रुपयांना मुलींची विक्री झाल्याचं प्रकरण काल उघड झालं. भारतात काही भागांत महिलांची खरेदी-विक्री सर्रास होते, ही चर्चा यापूर्वी अनेकदा झाली आहे. पत्रकारांनी सप्रमाण त्याचे पुरावे दिले आहेत. त्यावर आधारित नाटक-सिनेमे गाजले आहेत. अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. अनेक संस्थांनी सर्वेक्षणं करून या खरेदी - विक्रीमागच्या सामाजिक कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला आहे. महिलांची खरेदी-विक्री हा मानवी तस्करीचाच भाग मानून त्याबाबत देशात कडक कायदे आहेत. पण, तरीही अशी खरेदी-विक्री देशाच्या उत्तर भागात व्यवहाराचा नित्याचा भाग मानली जाते. गेल्या काही वर्षांत यात पुन्हा वाढ झाली असून हरियाणा, पंजाब आणि राजस्थान ही तीन राज्य त्यासाठी विशेष बदनाम आहेत. कृषी क्रांतीच्या अग्रणी असलेल्या या तीनही राज्यांत जमीन आणि स्थावर मालमत्तेला मोठी किंमत आणि प्रतिष्ठा असल्याने आजही तिथे मुलगाच जन्माला यावा, अशी धरणा सर्व सधन कुटुंबांत असते. स्त्री भ्रूणहत्येविरोधात कितीही कायदे झाले, प्रबोधनात्मक चळवळी झाल्या तरीही पुरुषसत्ताक समाजाची मनोवस्था अद्याप पूर्णपणे बदललेली नाही. काही अंशी बदल झाला असेलही. पण, त्याने स्त्रीभ्रूणहत्येने निर्माण होणारे प्रश्न संपलेले नाहीत. उत्तरेकडच्या काही राज्यातील ही स्थिती कागदावर आहेच; पण त्याचबरोबर समाजात त्यामुळे निर्माण झालेल्या कुप्रथांची चर्चाही सर्वत्र आहे. 'पारो', 'खरीदी हुयी', 'मोल की बहु' या घरांतील विशेषणांनी समाजात त्यांचा एक वेगळा दर्जाही तयार झाला आहे. सामाजिक स्तरावर अशा 'सुनां'साठी ही विशेषणं व्यापकपणे स्वीकारलीही गेली आहेत. अमेरिकेत छुपेपणाने पोहोचण्यासाठी जसा 'डन्की' मार्ग होता, तसाच या खरेदी केलेल्या महिलांना त्यांच्या खरेदीदार घरापर्यंत पोहोचवण्यासाठी वहिवाटीचे मार्गही तयार झाले आहेत. नेपाळबरोबरच देशातील बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, आंध्र, हिमाचल, झारखंड आणि ओडिशातल्या दुर्गम, ग्रामीण, गरीब कुटुंबातील मुलींची खरेदी करून त्यांना दिल्ली, पालवाल, कर्नाल, काल्का, अंबालातील ठरावीक ठिकाणी आणून नंतर खरेदीदारांच्या भागात पाठवलं जातं, असं यापूर्वी प्रसिद्ध झालं आहे.

उत्तरेतलं हे लोण महाराष्ट्रातही आलं आहे. विशेषतः आदिवासी पट्ट्यात दलालांनी आपलं जाळं विणलं असल्याचं कालच वाडा तालुक्यात दाखल झालेल्या एका पोलीस तक्रारीतून उघड झालं आहे. मूळ तक्रार कौटुंबिक हिंसाचाराची असली, तरी त्या तक्रारीच्या तपशिलात संबंधित महिलेला सिन्नर तालुक्यातील एका कुटुंबाने तीन लाख रुपयांना काही वर्षांपूर्वी खरेदी केलं असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. खरेदी केलेल्या या कुटुंबाने तिला सून म्हणूनच घरी ठेवलं असलं, तरी 'खरेदी' असल्याने तिच्यावर कामाचा असह्य बोजा होता. तेही ती नीट करत नाही, म्हणून तिला एकदा माहेरीही सोडून देण्यात आलं होतं. पण, नंतर तिला मुलगा झाल्यानंतर पुन्हा माहेरी पाठवून मुलासह खरेदीचे पैसे परत करण्याची मागणी सुरू झाल्याने प्रकरण चिघळलं आणि पोलिसात गेलं. त्यातून हा प्रकार उघड झाला. महाराष्ट्रातल्याच एका कुटुंबाने महाराष्ट्राच्या आदिवासी जमातीतील एक मुलगी विकत घेण्याचा हा प्रकार गंभीर तर आहेच; पण अन्य भागातला हा गैरप्रकार महाराष्ट्रातही फोफावला असल्याचा पुरावाच आहे. महाराष्ट्र हे सामाजिक - सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानलं जात असलं, तरी इथेही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार घडतच नाहीत, असं कोणी म्हणू शकणार नाही. त्याचं प्रमाण इतर राज्यांपेक्षा कमी असू शकेल. पण, 'वंशाला दिवा हवा' ही भावना इथेही प्रबळ आहेच. आर्थिक ओढगस्तीने एकाच अपत्याचा विचार समाजात रुजला असल्याने 'एकच अपत्य हवं, तर तो मुलगाच हवा' हा आग्रहही बळावला आहे. परिणामी महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण पुन्हा ढासळलं असून त्याची निश्चित आकडेवारीही उपलब्ध आहे. मुलांच्या विवाहाची समस्या जटिल झाली आहे. येत्या काही दिवसांत तीच महाराष्ट्रातील सर्वात मोठी सामाजिक समस्या म्हणून सोडावी लागणार आहे!

ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगावला काल जी घटना उघड झाली, त्यालाही हीच पार्श्वभूमी आहे. या सामाजिक समस्येतूनच महिलांच्या खरेदी - विक्रीला चालना मिळते आहे. विवाह समारंभांचे वाढलेले खर्च, हुंडा, मानपान, विवाहोत्तर राहणीमानाच्या कल्पना यामुळे मुलींच्या गरीब बापांची स्थिती बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत हा 'उलट हुंडा' ही दोन्ही बाजूंसाठी सोयीचीच बाब ठरते. मुलींच्या गरीब पित्यांना नाईलाजाने स्वीकारावी लागत असलेली ही 'व्यवस्था' सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मोठं आव्हान आहे. 'लाडकी बहीण'सारख्या योजनेचा अशा समस्यांवर काय उपयोग झाला किंवा होऊ शकतो, याचा सविस्तर अभ्यास व्हायला हवा. समाजातल्या तळागाळातल्या मुली-तरुणी-महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं हेच यावरचं एकमेव उत्तर आहे. नियोजनकर्त्यांनी त्यादृष्टीने महिला कल्याणाच्या योजनांचा विचार केला पाहिजे. योजनांची अंमलबजावणी, गरजूंपर्यंत त्या पोहोचवणं हा आणखी वेगळा मुद्दा आहे. त्यासाठी सामाजिक संस्थांची मदत प्रभावी ठरू शकते. ठाणे जिल्ह्यात उघड झालेली ही घटना महाराष्ट्राला लांच्छन आहे, असं समजून तिची तेवढ्याच गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. कोणत्याही घटनेमागील कारणांचा विचार केल्याशिवाय त्या घटनेचं विश्लेषण होऊ शकत नाही. गारगावला झालेल्या महिलेच्या खरेदी-विक्री व्यवहाराला या किंवा अशाच आणखी काही बाजू असू शकतील. त्या समजून घ्याव्याच लागतील. पण, त्याने महाराष्ट्रात महिलेची सहजपणे खरेदी-विक्री झाली, ही वस्तुस्थिती लपत नाही!




दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड, शुक्रवार, 16 जानेवारी 2026




# नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या पिठासीनतेखाली उपाध्यक्षपद व नामनिर्देशीत सदस्यांची निवड प्रक्रिया पूर्ण

## स्वीकृत नागसेवकपदी देवीप्रसाद चुन्नीलाल पांडे, बाजीराव प्रकाशराव धर्माधिकारी, प्रणव प्रकाश मराठे व अजीज अब्दुल हबीब कच्छी

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

परळी वैजनाथ नगरपरिषदेची पहिली सर्वसाधारण सभा आज गुरुवार, दि. 15 जानेवारी 2026 रोजी नगरपरिषद सभागृहात नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या पिठासीनतेखाली पार पडली. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सभागृहाचे कामकाज उत्तम प्रकारे पूर्ण पार पाडले. पीठासीन अधिकारी म्हणून ही पहिलीच सर्वसाधारण सभा होती यामध्ये नगराध्यक्षांच्या प्रशासकीय कामकाजाची सुरुवात चांगल्या प्रकारे दिसून आली.

नुकत्याच पार पडलेल्या नगरपरिषद निवडणुकीनंतर आज दि. 15 रोजी परळी नगर परिषदेच्या सभागृहात पहिली सर्वसाधारण सभा पार पडली.नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पिठासीन अधिकारी म्हणून नगर परिषदेची ही सभा पार पडली. या सभेत महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 च्या तरतुदीनुसार नगरपरिषदेच्या उपाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया राबविण्यात आली. निर्धारित वेळेत एकमेव नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्याने पठाण खैसर राजाखान यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केली.

सभेतील दुसऱ्या विषयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद व नगरपंचायत (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्ती) सुधारणा नियम 2010 अन्वये नगरपरिषदेवर चार नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये देवीप्रसाद चुन्नीलाल पांडे, बाजीराव प्रकाशराव धर्माधिकारी, प्रणव प्रकाश मराठे व अजीज अब्दुल हबीब कच्छी यांचा समावेश असून, यांची अधिकृत घोषणा पिठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी केली.

निवड प्रक्रियेदरम्यान सर्व कायदेशीर तरतुदी, नियम व अधिनियमांचे पालन करत ही प्रक्रिया गोपनीय पद्धतीने पार पाडण्यात आली. नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी पीठासीन अधिकारी म्हणून सभेचे कामकाज शिस्तबद्ध पद्धतीने हाताळले.

नवीन उपाध्यक्ष व नामनिर्देशित सदस्यांचे सभागृहात अभिनंदन करण्यात आले. उपस्थित सर्व नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी यांचे आभार मानून नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सभा संपन्न झाल्याचे जाहीर केले.



# माजी आ.भीमराव धोंडे यांनी रामकथेचे केले श्रवण; कथा निरूपणकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या कौशल्याचे कौतुक!




**आष्टी | प्रतिनिधी**

अध्यात्म हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मनुष्याच्या अंतिम समाधानासाठी धार्मिक कार्यक्रमात सहभाग आवश्यक असून त्यातून मिळणारे समाधान हे अंतिम असते असे उद्गार आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी काढले. दरम्यान,धार्मिक कार्यात निसंकोचपणे सर्वांनी उपस्थित राहून धर्म वाढवण्यासाठी सर्वोतोपरी सहभागी व्हावे असे आवाहनही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

आष्टी येथे आ.सुरेश धस आणि संयोजन समितीच्या वतीने संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथेच्या आयोजन करण्यात आले आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी शहरात श्रीराम कथेच्या मंडपामध्ये आज आवर्जून उपस्थिती लावली.रामकथेत पाचव्या दिवशी माजी आ. भीमराव धोंडे यांनी भेट देऊन संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथा निरुपणाच्या कौशल्याचे मन भरून कौतुक केले आणि या कथा आयोजकांचेही अभिनंदन केले.धार्मिक कार्यात्मिक संकोचपणे धर्म वाढवण्यासाठी आवर्जून उपस्थित असतो.सर्व नागरिकांनी आणि भाविक भक्तांनीही अशा धार्मिक उपक्रमात सहभागी झाले पाहिजे अशी भावना त्यांनी व्यक्त केली. या संगीत राम कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मानवी जीवनामध्ये सत्य,संयम,कष्ट, परिश्रम माणुसकी, मानवता, एकोपा, ऐक्य आणि सर्वधर्मसमभाव ही मूल्य मौल्यवान असतात.या मूल्याला अधोरेखित करण्याचे काम अर्थातच धर्म करीत असतो. त्या अनुषंगाने मानवता वादाचा सर्वांनी पुरस्कार करून अशा कथा निरूपणाला आवर्जून उपस्थित राहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी सौ प्राजक्ताताई धस, शैलजा थोरवे, सुखलाल मुथा, दिनकरराव तांदळे,अशोकदेवा जोशी, माजी सरपंच नामदेव राऊत, डॉ. मधुकर हंबर्डे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे,उत्तम बोडखे,प्रवीण पोकळे,सचिन रानडे,शरद रेडेकर,हौसराव आजबे,सतीशशेठ धस आदि सामाजिक, राजकीय, धार्मिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### कथाकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या पवित्रवाणीचा सुगंध दरवळला!

आपल्या पवित्रवाणीतून आणि केलेल्या अभ्यासातून रामायणातील अनेक प्रसंग साक्षात जिवंत करण्याचे हातोटी आणि कौशल्य ह.भ.प. मंदार महाराज रामदासी यांना लाभलेले आहे. त्यांच्या वाणीतून अनेक भाविक भक्तांमध्ये अध्यात्म समर्पणाचा भाव निर्माण होण्याची प्रेरणा निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करत ह.भ.प.मंदार महाराज यांच्या कथा निरूपण कौशल्याचे मनापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी कौतुक केले आणि आयोजकांनाही धन्यवाद दिले.

# जमिनीची काळजी घ्या जमीन तुमच्या पिकाची काळजी घेईल- डॉ. हरिहर कौसडीकर



**घाटनांदूर | प्रतिनिधी**

मातीचे पोत खराब झाल्याने व बदलत्या हवामानात शेती पुढील आव्हाने वाढत असताना, योग्य सूक्ष्म व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे काळाची गरज बनले आहे, तसेच तुम्ही जमिनीची काळजी घ्याल तर जमीन तुमच्या पिकाची काळजी घेईल.असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या मृद विज्ञान विभाग तज्ज डॉ. हरिहर कौसडीकर यांनी केले. वसुंधरा महाविद्यालय व घटेश्वर ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी घाटनांदूर यांच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा महाविद्यालयात (ता.१४) बुधवारी आयोजित जमिनीचे आरोग्य आणि पीक व्यवस्थापन चर्चासत्रात डॉ. कौसडीकर बोलत होते. त्यांनी आगामी काळात मातीची सुपिकता कायम ठेवणे आव्हान ठरणार असल्याचे सांगितले, "माती चांगली राखणे यासाठी शेतकऱ्यांना काही वर्षे तरी सातत्याने प्रयत्न करावे लागणार आहेत. मातीचे पोषण करण्यासाठी सेंद्रिय खत नैसर्गिक खत जैविक खत हिरवळीचे खत निंबोळी पेंडचा वापर करणे.

शेती व्यवसाय फायदेशीर होईल मातीचे दर्जा वाढल्यास उत्पादित मालाचा दर्जा चांगला राहील.अवेळी येणारा पाऊस, वाढता उन्हाळा आणि जमिनीचा खालावणारा पोत यामुळे पिकाचे उत्पादन घटत आहे. हे रोखण्यासाठी शेतकऱ्यांनी केवळ पारंपरिक पद्धतीवर अवलंबून न राहता 'मायक्रो मॅनेजमेंट'कडे वळणे गरजेचे आहे." डॉ. कौसडीकर यांनी बदलत्या हवामानाचा उसाच्या उत्पादकतेवर होणाऱ्या परिणामाबरोबर जमिनीचे आरोग्य कायम राखण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, ऊस लागवडीची योग्य पद्धत, पाणी देण्याच्या पद्धती, खत व्यवस्थापन या विषयावर शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाचे कृषी विद्यावेता प्रा. अरुण गुट्टे म्हणाले,जास्त उत्पन्न देणाऱ्या सोयाबीन व हरभरा तुरीच्या बियाण्याच्या नवीन वाणाची पेरणी करा. तसेच पीक लागवडीच्या पद्धतीत बदल करणे गरजेचे आहे. जमिनीची सुपीका सूक्ष्म जीवजंतूवर अवलंबून आहे. त्यासाठी सेंद्रिय खताचा वापर करून मातीतील सूक्ष्म जीवाणूंचा संवर्धन शेतकऱ्यांनी केल्यास जमिनीचे आरोग्य सुधारून शेतकऱ्याच्या उत्पादनात वाढ होईल.

अंबाजोगाई तालुका कृषी अधिकारी विजय पवार यांनी महाविस्तार ए आय ॲप वापराची माहिती दिली व शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईल महाविस्तार ए आय ॲप डाउनलोड करण्याचे आवाहन केले. घटेश्वर ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीच्या वतीने शेतकऱ्याचे उत्पादन वाढविण्यासाठी वेळो वेळी चर्चा सत्राच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाणार आहे. लवकरच शेतीमालाचे ग्रीटिंग व शेतीमाल निर्यात करण्यासाठी यंत्रणा भरण्यात करण्यात येणार आहे.

या चर्चा सत्राच्या अध्यक्षस्थानी घटेश्वर ॲग्रो प्रोड्यूसर कंपनीचे संचालक गोविंद देशमुख तर प्रमुख उपस्थिती डॉ. हरिहर कौसडीकर प्रा. अरुण गुट्टे विजय पवार अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजेश्वर चव्हाण बाबासाहेब देशमुख प्रा. प्राचार्य अर्जुन मोरे शंकरराव चव्हाण अजित गिरी ए एन पुरी डी डी मुंडे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक संजय रानभरे सूत्रसंचालन प्रा. मकरंद जोगदंड आभार प्रा. डॉ. सखाराम वाघमारे यांनी मानले. शेतकरी सुभाष चव्हाण महादेव शेटे राजाभाऊ सोनपीर कुमार सोनपीर गोपाळ सारडा गोविंद जाधव विशाल जाधव राजाभाऊ होळंबे प्रभू महाराज पुरी लहूदास गीते आदी उपस्थित होते.

### आष्टूर जिल्हा परिषद हायस्कूलचा उपक्रम

# बोला तुम्ही, बक्षीस देतो आम्ही उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला





**नांदेड |** विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने लोहा तालुक्यातील आष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी टोम्पे यांच्या संकल्पनेतून बोला तुम्ही, बक्षीस देतो आम्ही हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांना भाषण, संभाषण व आपले मत मांडण्याची संधी दिली जाते. त्यामुळे विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होत असून त्यांच्यात सभाधिटपणा, प्रसंगावधान व संवाद कौशल्याचा विकास होत आहे. विविध विषयांवर मुक्तपणे विचार मांडण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, रोख बक्षिसे तसेच थोर व्यक्ती व राष्ट्रीय नेत्यांची पुस्तके देऊन सन्मानित करण्यात येते. जयंती, पुण्यतिथी व दैनिक परिपाठाच्या माध्यमातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले जाते.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची गोडी निर्माण झाली असून स्पर्धात्मक परीक्षांकडे सकारात्मक दृष्टीकोन विकसित होत आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत असून ते विविध कार्यक्रमांमध्ये आत्मविश्वासाने आपले मत मांडताना दिसत आहेत.